
मिस्टर लिंकन – आश्चर्यकारक प्राचार्य

पेट्रीसिया



मराठी : अश्विनी बर्वे


ROOM 7
FOURTH GRADE
ESTERHAUSE

मिस्टर लिंकन – आश्चर्यकारक प्राचार्य

पेट्रीसिया




मिस्टर लिंकन जगभरातले सगळ्यात चांगले प्राचार्य होते. कमीत कमीत त्यांचे विद्यार्थी तरी असा विचार करत असत. ते सगळ्यात चांगले कपडे घालत,त्यांचे हसू सगळ्यात चांगले होते आणि ते सगळ्यापेक्षा प्रामाणिक काम करत. ते प्रत्येक वसंतात मिसेज़ वेस्टच्या किंडरगार्टन क्लास बरोबर चहाची पार्टी करत. ते मिस्टर ब्लिसच्या सहावीच्या वर्गातील मुलांना नेचर वॉकला घेवून जात असे. ते कधी-कधी शाळेच्या मागे असणाऱ्या तलावाच्या जवळ आपली दुर्बीण लावत असे आणि मुलांना आणि त्यांच्या प्रीवाराना ताऱ्यांचा लाभ्र घेण्यासाठी आमंत्रण करत असे.

 आणि हिवाळ्यात, ते ख्रिसमसच्या नाटकात सांताक्लॉज होत असत, आणि ते बाकीच्या धर्माच्या सणांमध्ये सुद्धा हौसेहौसेने भाग घेत असत.

तसे तर मिस्टर लिंकन बिलकुल साधे आणि शांत होते.






यूजीन एस्टरहाउस सोडून सगळेजण असाच विचार करत असत. यूजीनला सगळे लोक "मतलबी“ म्हणत. यूजीन सगळ्या शिक्षकांना चिडवत असे आणि मुलांबरोबर मारामारी करत असे.तो बिलकुल शाळेच्या विद्यार्थांसारखा नव्हता.त्याने इंग्रजीच्या वर्गात मिसेस डंकेलला वेडं केलं होतं. कलेच्या शिक्षिकेला तो वर्गात नको होता. यूजीन खूप बदमाश होता. तो नेहमी रागात असे, मुलांना शिव्या देत असे आणि संधी मिळताच तो त्यांना मारपीट करत असे.

"यूजीन वास्तवात वाईट मुलगा नाही.” मिस्टर लिंकन म्हणाले. “तो स्वतःच त्रासात आहे.” कहते थे.

पण पूर्ण शाळेत जवळजवळ प्रत्येकासाठी युजीन एक मोठा वैताग होता. तो एक दादा होता.




मग एक दिवस तो पहिलीच्या वर्गातील एका मुलीवर ओरडला “काय बघते आहे तू,बदमाश?” युजीन ओरडला. मग त्याने त्या मुलीला खाली ढकलले आणि तिचे दप्तर ओढले.

“मी मिस्टर लिंकन कडे तुझी तक्रार करेन,” मुलगी म्हणाली.

“जा,जा आनंदाने जा. मी मिस्टर लिंकनला बिलकुल घाबरत नाही.” मग तो थांबला.


कारण मिस्टर लिंकन तिथेच उभे होते. मग घंटा वाजली आणि युजीन पळून गेला.

आता मिस्टर लिंकन, यूजीनच्या बाबत गंभीरपणे विचार करू लागले. कोणास ठाऊक, मिस्टर लिंकन, यूजीनच्या हृदयाला कसा हात घालणार होते?



मग एक दिवस मिस्टर लिंकन पाचवीच्या वर्गाला झाड लावण्यासाठी मदत करत होते. तेव्हा त्यांनी पाहिलं की युजीन झाडाच्या फांद्याचे निरीक्षण करत होता.त्या फांदीवर एक चमकदार लाल कार्डिनल (पक्षी) बसला होता.. मिस्टर लिंकननी यूजीनला प्रांगणातील खिडकीत उभ्या असलेल्या आणि पक्ष्यांचे निरीक्षण करणाऱ्या युजीनला दोनवेळा बघितले..

मिस्टर लिंकनला आश्चर्य वाटले. हे शक्य आहे काय?




काही दिवसां नंतर मिस्टर लिंकनने यूजीनला आपल्या ऑफिसमध्ये बोलावलं. यूजीन एका खुर्चीवर बसला. मिस्टर लिंकनने आपल्या टेबलाचे ड्रॉवर उघडलं आणि त्यातून एक सुंदर पुस्तक काढले. ते चमकदार रंगीत पुस्तक पक्ष्यांच्याबाबत होते. त्यांनी एका पानाकडे बोट दाखवत म्हटले, “हे छोटे पक्षी माझ्या घराच्या जवळच्या झाडावर खूप आहेत, पण मला त्यांचे नाव माहित नाही.

यूजीन आपल्या खुर्चीवरून उठला आणि तो मिस्टर लिंकनच्या जवळ गेला. “ते रेड-कैप नटहैच आहे. वर्षभरात ते यावेळी नेहमी दिसत नाहीत.”

“असं वाटतं तुला पक्ष्यांची बरीच माहिती आहे!” मिस्टर लिंकन आश्वासक हसत म्हणाले.

“हो , मला माहित आहे कारण खूप काळ मी आजोबांच्या शेतावर राहिलो आहे, आणि तिथं खूप सारे पक्षी होते- कोंबड्या, धोबी,गवतावरील पक्षी. आम्ही तिथं कबुतरे पण पाळली होती.”

“तुझे आजोबा रसिक माणूस आहेत असं वाटतं.” मिस्टर लिंकन म्हणाले. मग यूजीन, मिस्टर लिंकनच्या खोलीतून बाहेर आला.



एका आठवड्यानंतर जेव्हा यूजीन एक दिवस प्रांगणाजवळून गेला- तेव्हा मिस्टर लिंकनने त्याला बघितले. तो उदास दिसत होता.

“तू मला मदत करशील का?” मिस्टर लिंकनने विचारले.

“काय!"

“ते प्रांगण पक्ष्यांनी भरलेलं पाहिजे. पण इथं कोणी पक्षी येतच नाहीत.” मग प्राचार्यांनी एट्रियम कडे बघितले.

“प्रांगणामध्ये चुकीची रोपे लावली आहेत, जी पक्ष्यांना आकर्षित करत नाहीत. आता त्यांच्यासाठी योग्य भोजन नाही.” मग युजीन दूर जावू लागला.


“ हे सगळं तुला तुझ्या आजोबांनी शिकवलं का?


यूजीनने वळून मिस्टर लिंकनकडे प्रथमच पाहिलं.

“ कदाचित."

“ तू प्रांगणा मध्ये पक्ष्यांना आकर्षित करण्यासाठी आम्हांला मदत करू शकतो का? युजीन?” मग मिस्टर लिंकनने यूजीन कडे पक्ष्यांचे पुस्तक सोपवलं. “बघ, कदाचित हे पुस्तक तुला काही मदत करेल.”

यूजीन आधी तर आवाक झाला. मग त्याने पक्ष्यांचे ते सुंदर पुस्तक त्याने हातात घेतलं,आणि हॉलच्या खाली निघून गेला.





जस जसे दिवस जाऊ लागले, त्या पुस्तकाने कधी युजीनची साथ सोडली नाही. इंग्रजीच्या शिक्षिकेने ते पुस्तक वर्गात वाचण्याची परवानगी दिली. “मी त्याला वाचतांना बघून खुश झाले.” मिसेज़ डंकल म्हणाल्या. आणि जेव्हा तो पुस्तक वाचत नसे ,तेव्हा तो नेहमी प्रांगणात असे. यूजीन आणि मिस्टर लिंकन यांनी पक्ष्यांना आकर्षित करण्यासाठी रोपं आणि झाडं आणि पक्ष्यांना खाण्यासाठी धान्य आणि उपयुक्त बियांची यादी तयार केली.

त्यांनी पक्ष्यांच्या खाद्यासाठी तीन फिडर तयार केले.



त्यांनतर प्रांगणात हळूहळू पक्षी येवू लागले. नटहॅच, ब्लूबर्ड्स, आणि अनेक रंगाचे फ़िन्चेस. इतके वेगवेगळ्या प्रकारचे पक्षी येवू लागले की सगळ्या शाळेतली मुलं वेळोवेळी पक्षी बघण्यासाठी आणि त्यांचे कारनामे बघण्यासाठी तिथं उभे राहत असत.

आता काही दिवसांपासून यूजीन खरंच खुश वाटत होता. तो आता दुसऱ्या मुलांना चिडवत नसे.


मग एक दिवस मिस चू, मिस्टर लिंकनच्या ऑफिस मध्ये आल्या "प्रांगणात एका घरट्यात दोन मॉलर्ड बदकं आहेत."

मिस्टर लिंकन हॉलमध्ये पोहचले, आणि तिथं त्यांनी एक नर आणि मादी मॉलर्ड तिथं पाहिले. त्यांचे घरटे प्रांगणात दक्षिण-पूर्व कोपऱ्यात होते. मिस्टर लिंकनने यूजीनला प्रांगणाच्या दुसऱ्या बाजूला उभा असलेलं पाहिलं. आणि त्यांनी त्याला शाब्बासकीचे थम्स-अप दिलं.

"मला आशा वाटते की बदकांची ही जोडी आपली अंडी देतील," युजीनने एक दिवस म्हटलं. काही दिवसानंतर मिस्टर लिंकन यांनी घरट्यात पाच अंडी बघितली. "बस एक समस्या आहे. बदकांनी पाण्याजवळ राहणे गरजेचे आहे. त्यांना बाहेर तलावावर जावं लागेल. कारण त्यांची मुलं आपल्या आई वडिलांसारखे उडू शकणार नाही."

"मला आशा आहे यूजीन की तू विचार करून यावर उत्तर शोधशील," मिस्टर लिंकन म्हणाले. आणि मग त्यांनी युजीनच्या खांद्यावर हात ठेवला.

आता यूजीन काही मतलबी मुलगा राहिला नव्हता.



तीन दिवसा नंतर हॉल मध्ये गोंधळ माजला होता. मिसेज़ बेल्डिंग यूजीनला घेवून मिस्टर लिंकनच्या कार्यालयात पोहचली.

मिस्टर लिंकनने यूजीनकडे अविश्वासाने बघितलं. “ काय झालं?” त्यांनी विचारलं.

“माझी इच्छा आहे की यूजीननेच तुम्हांला पूर्ण गोष्ट सांगावी,” मिसेज़ बेल्डिंग म्हणाल्या.

पण यूजीनने तसं काही केलं नाही. तो घृणास्पद आणि उद्धट दिसत होता.

“जेवणाच्या रांगेत त्रास सुरु झाला,” मिसेज़ बेल्डिंग म्हणाल्या. यूजीनने मेक्सिकोहून आलेल्या आपल्या दोन विद्यार्थांना निवडलं त्याने “बोकड” आणि “पांढऱ्या कातडी” या नावाने त्यांना चिडवलं.



“मी या घटनेची तपासणी करेन,” मिस्टर लिंकनने चुपचाप म्हटलं. मिस्टर लिंकन मुला समोर बसले.

"यूजीन, माझी त्वचा पण भूरी आहे.” यूजीनने मिस्टर लिंकनकडे बघितलं.

“हे मला माहित आहे, यूजीन – जी व्यक्ती पक्ष्यांवर प्रेम करते,जसे तू करतो, त्या व्यक्तीच्या हृदयात द्वेष असू शकत नाही.”

मग यूजीन रडू लागला. “ जेव्हा मी तुम्हांला मदत केल्यानंतर घरी जातो तेव्हा माझे वडील एकदम चिडले.”

त्यांने हुंदका देत म्हटले, “ ते म्हणाले की आता तू आमच्या सारखा राहिला नाही.”



“आमच्या सारखा," मिस्टर लिंकन म्हणाले..

ते यूजीनला प्रांगणाच्या खिडकीकडे घेवून गेले. तिथलं वातावरण पक्ष्यांच्या किलीबिलीमुळे जिवंत झाले होते. "मला चिमणी, नीलकंठ, कार्डिनल्स, नटहैच आणि मॉलर्ड दिसत आहेत. हे वेगवेगळ्या प्रकारचे आणि रंगाचे पक्षी या जागेला सुंदर करत नाही का?”

यूजीनने हो अशी आपली मान हलवली.

"ठीक आहे , देवानेच या सगळ्यांना बनवलं आहे. सगळ्या प्रकारच्या पक्ष्यांना. त्याने आपल्या सर्वांना वेगवेगळे बनवले आहे,, यूजीन, सत्य हे आहे की,शाळेत तुझ्या सारखे सगळी मुलं- मतभेद आणि तुमच्यातील अंतरासहित –माझे छोटे पक्षी आहेत. हो माझे छोटे पक्षी! आणि तुझ्या वडिलांनी जे काही म्हटलं त्यातलं काय बरोबर, काय चूक, त्याचं उत्तर सुद्धा यातच आहे.” मिस्टर लिंकन म्हणाले.



“माझे वडील तुम्हांला वाईट नावाने हाक मारतात, मिस्टर लिंकन. त्यांच्याजवळ प्रत्येकासाठी जो त्यांच्यापेक्षा वेगळा आहे, त्यासाठी एक वाईट नाव आहे.”

मिस्टर लिंकन बऱ्याच वेळ काहीच बोलले नाही. "यूजीन, कधी कधी लोक आपल्या विचारात फसतात जसे बदकं त्या प्रांगणात फसले होते,” मिस्टर लिंकन विचारपूर्वक म्हणाले.

“पण माझे आजोबा असे नव्हते.”

मिस्टर लिंकन यांनी मुलाच्या खांद्यावर हात ठेवला. “मला तुझ्या आजोबांना भेटायचं आहे. पण युजीन, तू मला एक वचन दे, घरात कितीही वाईट गोष्टी घडल्या तरी, तू शाळेत माझ्या सगळ्या छोट्या पक्ष्यांबरोबर दयेने आणि सन्मानाने वागशील. तू कोणाला चिडवणार नाही आणि न कोणाला वाईटसाईट बोलशील. कृपया मला वचन दे.

यूजीनने वचन दिले.



जस जसे दिवस जाऊ लागले, मॉलर्ड नर-मादी प्रांगणाच्या बाहेर निघून शाळेच्या मागच्या तलावावर निघून गेले. ते आता आपल्या पिल्लांना बऱ्याच वेळासाठी एकटं सोडून जात असत. यूजीन आणि मिस्टर लिंकन यांना माहित होते की आता अशी वेळ आली आहे की, जेव्हा त्यांना बदकांच्या पिल्लांना प्रांगणाच्या बाहेर घेवून जाऊन तलावापर्यंत नेणं गरजेचे आहे. त्यासाठी त्यांनी एक योजना तयार केली.





आणि जेव्हा तो मोठा दिवस आला, तेव्हा मुलांना त्यांच्या त्यांच्या वर्गात थांबायला सांगितलं. मग यूजीन आणि मिस्टर लिंकनने प्रांगणाचा दरवाजा उघडला आणि ते आत गेले. त्या दोघांनी मॉलार्ड आई-बाबा सारखे "गिंग ... गिंग“ म्हणण्याचा अभ्यास केला होता. मग त्यांनी बदकांच्या पिल्लांबरोबर गप्पा मारल्या,आणि त्यांना त्यांच्या मागे-मागे यायला राजी केलं.

नर मल्लार्ड, प्रांगणाच्या दरवाज्यावर चढला आणि त्याने हॉलच्या खाली बघितलं.हॉलच्या शेवटी नर मल्लार्ड, लॉन आणि तलाव दोन्ही बघू शकत होता.

"गिंग ... गिंग," यूजीन म्हणाला.




मादी मल्लार्ड प्रथमच बाहेर आली, मग एक-एक करून त्यांची पिल्लं त्यांच्या मागे-मागे आलीत. तो त्यांना परत-परत बोलावत होता, आणि मल्लार्ड परिवार त्याच्या मागे-मागे जात होता.

मग नर-मादी लगेच पुढे झाले आणि बदकांची पिल्लं त्यांच्या मागे-मागे पळत गेली. बाहेरच्या दरवाज्यावर पिल्लं एक क्षण थांबले, मग. नर-मादी मल्लार्ड यांनी दरवाज्याच्या बाहेर उडी मारली आणि त्यांनी आपल्या प्रत्येक पिल्लाला आज्ञा पालन करण्यासाठी तयार केलं.



मिस्टर लिंकन आणि यूजीन दोघांनी बदकांना पहाडावरून खाली पळत जातांना बघितलं. शेवटी नर-मादी बदकांनी आणि त्यांच्या पिल्लांनी एकत्रच तलावात उडी घेतली.

“आता मला कळलं की बदकांच्या पिल्लांना पाणी किती आवडतं,” मिस्टर लिंकन हसत म्हणाले. त्यांचा विश्वास बसत नव्हता की बदकाची पिल्ले इतकी छान पोहू शकतील.



शाळेतल्या मुलांचे आईवडील पहाडावर एकत्र जमा झाले होते- त्यांना दुरून बघायला सांगितलं होतं . मग यूजीनने मागून त्याला कोणी हाक मारल्याचा आवाज ऐकला. “यूजीन! बेटा तू कसा आहे!”

ते यूजीनचे आजोबा होते! यूजीन पहाडाकडे पळत गेला. मिस्टर लिंकन पण तिथं गेले.

“हे माझे आजोबा आहेत!” यूजीन म्हणाला.

“मला माहित आहे,” मिस्टर लिंकन म्हणाला.

यूजीन त्यांच्याकडे वळाला. मिस्टर लिंकनचा हा चमत्कार होता काय? त्याचे आजोबा इथं असण्याशी त्यांचं काही घेणं-देणं होतं का?

मग आजोबांनी मिस्टर लिंकन यांच्याशी मनापासून हात मिळवला. “मी निश्चितपणे परत तुमच्या बरोबर राहू इच्छितो, आजोबा,” युजीन म्हणाला. आणि मग युजीन आणि त्याचे आजोबा एकमेकांच्या बरोबर पहाडावर चालत गेले.


आजोबांनी आपला हात मुलाच्या खांद्यावर ठेवला. “ आपण बघू या, बेटा ,आपण जरूर बघू या.” ते म्हणाले.



नंतर यूजीन आणि मिस्टर लिंकन बरोबर तलावाच्या किनाऱ्यावरून खाली उतरले. यूजीन, मिस्टर लिंकनला काही सांगू इच्छित होता.

“तू त्या बदकांना बाहेरचा रस्ता दाखवला, युजीन,” मिस्टर लिंकन म्हणाले.

“पण, तुम्ही मला माझ्या काळ्या कोठीतून बाहेर येण्याचा रस्ता दाखवला, मिस्टर लिंकन." यूजीन हसला. मग तो थांबला आणि त्याने आपल्या प्राचार्यांच्या डोळ्यात बघितलं. “मिस्टर लिंकन, मी जरूर असं काही करेन ज्यामुळे तुम्हांला माझा गर्व वाटेल. मी वचन देतो.”



समाप्त